
कासावली सामूहिक अत्याचार प्रकरणात दोन आरोपींना सशर्त जामीन » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com


१९८६: भारताचा इंग्लंडवर ऐतिहासिक कसोटी विजय » पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, १९ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 287 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 19 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# गोविंद गावडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी !

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १८ : भाजप सरकारमध्येच मंत्री असतानाही खुद्द मुख्यमंत्र्यांकडच्याच खात्यावर भ्रष्टाचाराचे जाहीर आरोप करणारे निर्भीड मंत्री आणि प्रियोळचे आमदार गोविंद गावडे यांची अखेर मंत्रीमंडळातून हकालपट्टी करण्यात आली आहे . विशेष म्हणजे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी गोवा क्रांतिदिनीच हा निर्णय घेतला आहे . दरम्यान आदिवासींच्या हक्कांसाठी आवाज उठवल्याबद्धल जर आपल्यावर कारवाई झाली असेल तर त्याचे मी स्वागतच करतो असे गावडे यानी म्हटले आहे .**

गोवा क्रांती दिनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांची त्यांच्या मंत्रिमंडळातून हकालपट्टी करत राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम दिला. सरकारविरुद्ध सार्वजनिकरित्या केलेल्या भ्रष्टाचारविरोधी टीकेनंतर जवळपास तीन आठवड्यांपासून गावडे यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी सायंकाळी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या शिफारशीनुसार राज्यपालांनी गावडे यांना मंत्रिमंडळातून हटवण्यास मान्यता दिली असून, हा निर्णय तात्काळ प्रभावी करण्यात आला आहे. दरम्यान साखळी येथे एका कार्यक्रमात सहभागी झालेले मुख्यमंत्री सावंत यांनी पत्रकारांशी बोलताना गावडे यांची हकालपट्टी झाल्याची पुष्टी केली, मात्र याबाबत सविस्तर माहिती देण्याचे त्यांनी टाळले.



## गोवा क्रांतिदिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्र्यांनी घेतला निर्णय : राज्यपालांनी दिली मंजूरी

भाजप प्रदेशाध्यक्ष दामोदर नाईक यांनी सांगितले की, ही कारवाई पक्ष आणि मुख्यमंत्र्यांनी एकमताने घेतलेली असून, ही प्रक्रिया काही दिवसांपासून सुरू होती.

# मायरॉन रॉड्रिग्जवर इंटरपोलची नोटीस

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ मायरॉन १०० कोटी रुपयांच्या गुंतवणूक फसवणुकीतील फरार आरोपी

**पणजी, दि. १८ :** कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील प्रमुख आरोपी मायरॉन रॉड्रिग्जविरुद्ध अखेर आंतरराष्ट्रीय पातळीवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. गोवा पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने केलेल्या औपचारिक विनंतीनंतर इंटरपोलने रॉड्रिग्जविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस जारी केली आहे .

रॉड्रिग्ज, त्याची पत्नी दीपाली परब आणि माजी पत्नी सुनीता रॉड्रिग्ज यांच्यावर, शेअर बाजारातील गुंतवणुकीवर खोटे वादे करून उच्च परताव्याची आमिषे दाखवून सुमारे १०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. ५० हून अधिक गुंतवणूकदार या फसवणुकीचे बळी ठरले असून, यातील बहुतांश गुंतवणूकदार साष्टी तालुक्यातील रहिवासी आहेत.

या प्रकरणाची सुरुवात नावेली येथील इव्हॉन सुरेश अल्मेडा यांनी दिलेल्या तक्रारीने झाली होती, ज्यामध्ये त्यांनी ३६.५४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आलेल्या तक्रारींमुळे एकूण फसवणुकीची रक्कम १०० कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. हा गैरव्यवहार २०११ पासून सुरू असल्याचे समोर आले आहे.

पोलिस तपासात स्पष्ट झाले की, मायरॉन रॉड्रिग्ज स्वत:ला स्टॉक ब्रोकर म्हणून सादर करीत असे तर दीपाली परब आर्थिक सल्लागार असल्याचा दावा करत होती. मात्र, हे दोघेही ना सेबी किंवा ना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्याकडे नोंदणीकृत होते२५ फेब्रुवारी २०२५ रोजी मडगाव येथील प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायालयात या प्रकरणात मायरॉन रॉड्रिग्ज आणि दीपाली परब यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले होते.

रॉड्रिग्ज हा सतत समन्सला अनुपस्थित राहत असल्याने, प्रथम इंटरपोलमार्फत ब्लू कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली होती. पुढील तपासात तो दुबईमार्गे लंडनला पलायन केल्याचे समोर आले. त्यानंतर देशातील इमिग्रेशन ब्युरोकडून लूक–आउट सर्क्युलर जारी करण्यात आली. अखेर हे प्रकरण रेड कॉर्नर नोटीसपर्यंत पोहोचले.

पान २ ▶

# खोमेनीने भरला ट्रम्प यांना दम : हल्ला केल्यास गंभीर परिणाम !

तेहरान/जेरुसलेम, दि. १८ :

इराणचे सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, इराण कोणतेही लादलेले युद्ध किंवा बनावट शांतता स्वीकारणार नाही. त्यांनी अमेरिकेला इशारा दिला आहे की, जर वॉशिंग्टनने कोणतीही लष्करी कारवाई केली, तर त्याचे गंभीर आणि अमर्याद परिणाम होतील.

दरम्यान, इस्त्रायलने आज इराणमधील तब्बल ४० ठिकाणी हवाई हल्ले केल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यांमध्ये सेंट्रीफ्यूज निर्मिती केंद्रे, शस्त्रास्त्र उत्पादन युनिट्स यांचा समावेश असल्याचे इस्त्रायली सूत्रांनी सांगितले. प्रत्युत्तरादाखल इराणने इस्त्रायलच्या दिशेने ड्रोनचा मोठा थवा पाठवला आहे.

या परस्पर हल्ल्यांच्या परिणामी आतापर्यंत २४० हून अधिक नागरिकांचे बळी गेले असून, त्यामध्ये ७० महिला आणि लहान मुले आहेत. इस्त्रायली भूभागावर झालेल्या इराणी ड्रोन हल्ल्यांतही २४ पेक्षा जास्त जण ठार झाल्याचे वृत्त आहे.



माजी ब्रिटिश राजदूत रिचर्ड डाल्टन यांच्या म्हणण्यानुसार अमेरिकन प्रशासन इराणच्या फोर्डो अणुउर्जा केंद्रावर बंकर बस्टर बॉम्ब' वापरण्याचा गंभीर विचार करत आहे. फोर्डो हे प्रचंड खोल भूगर्भातील आणि अत्यंत संरक्षित केंद्र असून ते इराणच्या अणुकार्यक्रमाचा मुख्य आधार आहे.या केंद्राचे नाश करण्यासाठी शेकडो मीटर खडक आणि काँक्रीट भेदू शकणाऱ्या बॉम्बची आवश्यकता आहे. अमेरिकन अधिकारी अशा लष्करी मोहिमेच्या तांत्रिक शक्यता आणि परिणामांचे मूल्यांकन करत आहेत, असे डाल्टन यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की व्हाईट हाऊस दोन महत्त्वाच्या मुद्द्यांचा विचार करत आहे पहिला म्हणजे, इराणकडून अमेरिकन सैनिकी तळ, प्रकल्प आणि त्यांच्या भागीदारांवर होणारी संभाव्य कारवाई; दुसरा म्हणजे, डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला नवीन युद्धात न अडकवण्याचे दिलेले आश्वासन आणि त्यातून होणारा राजकीय परिणाम.

इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने म्हटले आहे की, इस्त्रायलवरच्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमध्ये सेजील' या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला आहे. एका निवेदनात त्यांनी स्पष्ट केले की, आमची क्षेपणास्त्रे आणि ड्रोन ही व्याप्त भूभागांवर मुक्तपणे कार्यरत राहतील.इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने इशारा दिला आहे की, या हल्ल्यांची मालिका केवळ केंद्रितच नव्हे तर सातत्यपूर्ण असेल.

इराणच्या तडाखेबाज प्रत्युत्तराविषयी विचारले असता माजी ब्रिटिश राजदूत रिचर्ड डाल्टन म्हणाले की , अशी तीव्र प्रतिक्रिया ही एका अपराजित देशाकडून अपेक्षितच होती.इराणवर झालेल्या हल्ल्यांमुळे त्याच्या ओळखीवर, नागरी सुविधा, सामान्य जनता आणि सत्ताधाऱ्यांच्या अस्तित्वावरच घाला आला आहे. त्यामुळे संताप स्वाभाविक आहे, असे त्यांनी सांगितले.डाल्टन यांनी स्पष्ट केले की, अमेरिकेच्या वागणुकीतील अनिश्चितता ही संपूर्ण पश्चिम आशियासाठी आणि जागतिक शांततेसाठी गंभीर चिंता बनली आहे.

# टॅक्सी ऑपरेटर्सच्या मेळाव्यांवर बंदी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारने मतभेद आणि लोकशाही अभिव्यक्तीला डावलत हुकूमशाही पद्धतीने कारभार चालवला आहे, असा गंभीर आरोप ऑल गोवा टुरिस्ट टॅक्सी ऑपरेटर्स असोसिएशन'ने बुधवारी केला.

असोसिएशनचे प्रतिनिधी सुनील नाईक यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, सरकारने जनतेकडून सूचनांचा आणि हरकतींचा आग्रह केला होता, म्हणून आम्ही टॅक्सी चालकांना सहभागी होण्याचे आवाहन केले. मात्र, सरकारने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अंतर्गत कलम १६३ लागू करून आम्हाला एकत्र येण्यापासून रोखले. ही लोकशाहीची थट्टा आहे.

नाईक यांनी स्पष्ट केले की, हे कोणतेही आंदोलन नव्हते. आम्ही फक्त आमचा विरोध आणि चिंता व्यक्त करायला आलो होतो. पण पोलिस तैनात करून आम्हाला अडवलं जातंय. ही भीती दाखवण्याची पद्धत आम्हाला स्वीकारार्ह नाही. आम्ही सरकारला सांगू इच्छितो की , टॅक्सी ऑपरेटर तरुणांना घाबरवू नका. जर कोणी नवीन ॲग्रीगेटर ॲपच्या विरोधात असेल, तर त्यांनी आपल्या भूमिका मांडाव्यात हे आमचं आवाहन आहे.

याआधी उत्तर गोवा जिल्हा प्रशासनाने जंटा हाऊस परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले होते. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत हे आदेश लागू करण्यात आले असून, त्यात पाच किंवा अधिक लोकांच्या जमावावर बंदी घालण्यात आली होती.

गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नवीन वाहतूक संकलक मार्गदर्शक तत्त्वांना विरोध करणाऱ्या २,००० हून अधिक टॅक्सी चालकांचा निषेध कार्यक्रम होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले. प्रशासनाने यामागे सार्वजनिक सुव्यवस्था राखणे आणि कोणताही गोंधळ टाळणे' असा उद्देश सांगितला.

पणजी पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही प्रकारचे शस्त्र, काठ्या, फलक, बॅनर, लाऊडस्पीकर किंवा अन्य अशा वस्तू घेऊन फिरण्यावरही बंदी घालण्यात आली आहे, ज्या बेकायदेशीर जमावासाठी वापरल्या जाऊ शकतात.

२० मे रोजी नव्या मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला होता. याबाबत सर्व संबंधित भागधारकांना एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार, आज (बुधवार) हरकती आणि सूचना सादर करण्याचा अंतिम दिवस होता.

राज्यात टॅक्सी क्षेत्रातील अनेक चालक आणि स्थानिक संघटना नवीन ॲग्रीगेटर ॲप धोरणाला विरोध करत आहेत. त्यांच्या मते, हे धोरण स्थानिक व्यवसायावर घाला आहे आणि त्यांची उपजीविका धोक्यात येईल.

सरकारने मांडलेली लोकाभिमुखतेची प्रतिमा आणि प्रत्यक्षात केलेल्या कारवायांमधील दरी आता स्पष्टपणे जाणवू लागली आहे, असा सूर या घटनांमधून उमटू लागला

# गोव्याची कायदा सुव्यवस्था रसातळाला !

## गोवा क्रांतिदिनी खुद्द स्वातंत्र्यसैनिकांचाच थेट आरोप | मुख्यमंत्र्यांना सुनावले खडे बोल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** गोव्याच्या मुक्तीसाठी आम्ही गोळ्या झेलल्या, पण गुन्हेगारीने बरबटलेल्या गोव्याचे स्वप्न कधीच पाहिले नव्हते, अशा शब्दांत गोवा, दमण आणि दीव स्वातंत्र्यसैनिक संघटनेचे अध्यक्ष रोहिदास ऊर्फ दादा देसाई यांनी आजच्या गोव्यातील बिघडलेल्या सामाजिक परिस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

पणजी येथील आझाद मैदानावर आयोजित गोवा क्रांतिदिन कार्यक्रमात हुतात्मा स्मारकास अभिवादन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमात राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मंत्री सुभाष शिरोडकर, मंत्री सुदिन ढवळीकर, तसेच आमदार युरी आलेमाव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

देसाई म्हणाले की, राज्यात कायदा–सुव्यवस्थेची स्थिती चिंताजनक बनली आहे. रोज नवनवीन गंभीर गुन्हे, खून, ड्रग्स व्यवहार समोर येत आहेत. हे सारे



पाहून मन व्यथित होते. हे थांबवण्याची जबाबदारी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची आहे. त्यांनी मुख्यमंत्री सावंत यांना थेट आवाहन करत सांगितले की, आपण तरुण आणि सक्षम मुख्यमंत्री आहात. त्यामुळे आपण या गंभीर स्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने कारवाई करावी.

राज्यात उरलेले स्वातंत्र्यसैनिक आता हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत, याची आठवण करून देत देसाई म्हणाले की,आम्हाला मिळणाऱ्या सवलती केवळ आमच्यासाठी असाव्यात, असे म्हणणे गैर आहे. स्वातंत्र्यसैनिकांनी समाजासाठीही योगदान द्यावे, आपल्याला मिळणाऱ्या लाभांतून काही भाग समाजसेवेसाठी खर्च करावा, ही खरी राष्ट्रसेवा ठरेल.

देसाई यांनी मुख्यमंत्री यांना विनंती केली की, वाढत्या गुन्हेगारी आणि अपघातांवर नियंत्रण ठेवण्याचे धोरणात्मक पावले उचलावीत. गुन्हेगारीचं सध्याचं वाढतं प्रमाण पाहता, सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेचं वातावरण निर्माण झालं आहे.

गोवा स्वातंत्र्याचा लढा हा फक्त भूतकाळात गुंतून ठेवण्याचा विषय नसून, त्या लढ्याच्या मूल्यांची जपणूक आजच्या सरकारने करावी, असा रोखठोक सल्ला देसाई यांनी दिला. क्रांती दिनाच्या निमित्ताने त्यांच्या या ज्वलंत वक्तव्याने उपस्थितांच्या मनात विचारांची नवी पालवी फुटली.

> **’ लोहिया यांनी १९४६ साली क्रांतीची पहिली ज्योत पेटवताना जे गोव्याबाबतचे स्वप्न पहिले होते ते गोवा आता साकार होत असून पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकास या क्षेत्रात गोव्याने नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. गोवा राज्य लहान असले तरीही जीडीपीच्या बाबतीत अव्वल ठरले आहे. आत्मनिर्भर भारत आणि स्वयंपूर्ण गोवा हे ध्येय समोर ठेवून आमचे सरकार काम करीत आहे .’**
>
> **-डॉ , प्रमोद सावंत ( मुख्यमंत्री )**

> **आमच्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कल्पनेतला गोवा घडवणे हे आमचे आणि आमच्यासारख्या तरुण पिढीचे कर्तव्य आहे. विकासकामांच्या नावाखाली आज गोव्यात बाहेरच्या राज्यातील भांडवलदारांनी बस्तान बसवत गोवा उद्धवस्त करण्याचे काम हाती घेतले आहे . मूळ गोवेकर यातुन अस्तित्वहीन होत आहे. कित्येकांनी गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले बलीदान व्यर्थ जाऊ देता कामा नये. शिक्षण , आरोग्य , पर्यटन , उद्योग , पायाभूत सुविधा अशा क्षेत्रात गोव्याने अद्यापही अपेक्षित प्रगती गाठलेली नाही . ’**
>
> **-युरी आलेमाव ( विरोधी पक्षनेता )**

## निवडक

### मोसादच्या गुप्तहेरांचा खेळ खल्लास ?

**नवी दिल्ली, दि. १८ :** इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा भडका उडाला आहे. हे दोन्ही देश एकमेकांवर मोठे हल्ले करत आहेत. दरम्यान, सध्या इस्त्रायल इराणमधील अनेक महत्त्वाच्या स्थळांवर तसेच इराणाच्या राजधानीलाही लक्ष्य करताना दिसतंय. आता मात्र इराणनेही इस्त्रायलला जशास तसं उत्तर देण्याचं ठरवलंय. मिळाळेल्या माहितीनुसार इराणकडून इस्त्रायलच्या मोसाद या गुप्तहेर संघटनेच्या गुप्तहेरांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात झाली आहे. इस्त्रायलने काही दिवसांपूर्वी इराणच्या लष्करी तळांवरत सेच उर्जानिर्मिती करणाऱ्या अणूउर्जा प्रकल्पांवर बॉम्बगोळे फेकले होते. त्याशिवया इस्त्रायलने इराणच्या जवळपास ३० सैन्यअधिकाऱ्यांना ठार केलंय. यातील बरेच हल्ले हे इस्त्रायलने इराणमध्ये असलेल्या आपल्या एजंट्सच्या माध्यमातूनच केले आहेत. इस्त्रायलचे हे गुप्तहेर इराणसाठी चांगीलच डोकेदुखी ठरले आहेत.
आता इस्त्रायलच्या याच गुप्तहेरांच्या मुसक्या आवळण्याची मोहीम आता इराणने हाती घेतली आहे.
इराणकडून या गुप्तहेरांचा कसून शोध घेतला जात आहे. इराणने आतापर्यंत अशा ३८ संशयित गुप्तहेरांना पकडले आहे. या लोकांनी इस्त्रायलसाठी इराणमध्ये जासुसी केल्याचा आरोप आहे. आगामी काळात या कारवाईत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.
रविवारी म्हणजेच १५ जून रोजी इराणने इस्त्रायलच्या मोसाद या बलशाली गुप्तहेर संघटनेच्या दोन गुप्तहेरांना अटक केलं.

### ब्रिटीश गुप्तचर एजन्सी एमआय ६ प्रमुखपदी पहिल्यांदाच महिलेची नियुक्ती

**इंग्लंड, दि. १८ :** ब्रिटनच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिला अधिकाऱ्याला गुप्तचर संस्था एमआय ६ च्या प्रमुखपदी नेमले आहे. 'जेम्स बॉण्ड' पटात या संस्थेची प्रमुख महिला दाखवलेली असली तरी ब्रिटनच्या ११६ वर्षांच्या इतिहासात आता प्रथमच प्रत्यक्षात एखादी महिला ब्रिटनच्या गुप्तचर संस्थेची प्रमुख झाली आहे.
आपण प्रसिद्ध गुप्तहेर जेम्स बाँडचे हॉलिवूड चित्रपट नक्कीच पाहिले असतील. या चित्रपटांमध्ये मिस्टर ००७' म्हणजेच जेम्स बाँड' या एका गुप्तहेरांच्या अचाट कामगिरीने तुम्ही नक्कीच प्रभावित झाला असेल. जेम्स बॉण्ड हा ब्रिटनच्या गुप्तचर संस्थेकडून म्हणजेच चख६ कडून आदेश घेऊन काम करताना दाखवला आहे. मात्र प्रत्येक चित्रपटात जेम्स बाँडला आदेश देणारी एमआय ६ ची संचालक एक महिला असली तरी, ब्रिटनच्या ११६ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच एका महिलेलाच एमआय ६ संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

### अण्वस्त्र परवानगी नाहीच; इराणबाबत जी–७ देशांची भूमिका

**कनान्स्किस, दि. १८ :** इराणला अण्वस्त्रांची परवानगी नाहीच, अशा स्पष्ट शब्दांत जगातील सात विकसित देशांनी एकमुखी भूमिका मांडली. इस्त्रायल आणि इराण यांनी सध्याचा संघर्ष तातडीने थांबवावा, असेही या देशांनी प्रसिद्ध केलेल्या संयुक्त जाहीरनाम्यात म्हटले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तडकाफडकी सोमवारी सायंकाळी ही परिषद अर्ध्यावर सोडून अमेरिकेला परतले. मात्र, तत्पूर्वी संयुक्त निवेदन प्रकाशित करण्यात आले. त्यामध्ये इराणला कोणत्याही परिस्थितीत अणुबॉम्ब तयार करू दिला जाणार नाही, हे स्पष्ट करण्यात आले.
पश्चिम आशियामध्ये शांतता नांदावी, यासाठी आम्ही जी–७चे नेते कटिबद्धता व्यक्त करतो. या संदर्भात इस्त्रायलला स्वरक्षणाचा पूर्ण अधिकार आहे, ही बाब आम्ही स्पष्ट करतो. इस्त्रायलच्या सुरक्षेसाठी आमचा पाठिंबा आहे, याचा पुनरुच्चार आम्ही करतो.
नागरिकांच्या सुरक्षेचे महत्त्वदेखील आम्ही अधोरेखित करीत आहोत.
पश्चिम आशियातील अशांतता आणि दहशतवाद यासाठी इराण कारणीभूत आहे.